पोलीस कार्यालय
भडगांव जि. जळगांव

प्रेस नोट

भडगांव पोलीस स्टेशन
दिनांक २९/०४/२०२५

**सोशल मिडीयावर लहान मुलास मारहाण व शिवीगाळ करणारा व्हिडीओ व्हायरल झाल्याने त्यातील इसमाचा शोध घेवुन २४ तासात कारवाई.**

प्रती,

मा. संपादक सो।

- - - - - - - - - - - - - - - - -

दिनांक २८/०४/२०२५ रोजी एका लहान मुलाचा अभ्यास घेत असतांना एक इसम त्याला मारहाण व शिवीगाळ करीत होता व तो असे कृत्य करीत असल्याचा व्हिडीओ हा सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने मा.पोलीस अधिक्षक सो. जळगाव यांनी सदरचा व्हायरल व्हीडीओ पाहुन हा प्रकार भडगाव तालुक्यातील असले बाबत सांगुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सदर व्हिडीओ मधील मारहाण व शिवीगाळ करणारा इसम यांच्या बाबत खात्री करुन शोध घेतला असता व्हायरल झालेल्या व्हिडीओ बाबत माहीती घेत असतांना सदर व्हीडीओ भडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील कोळगाव ता. भडगाव येथील असल्याची खात्री झ ाली. त्यावरुन मा.पोलीस अधिक्षक माहेश्वर रेड्डी सो, जळगाव, मा. अपर पोलीस अधिक्षक सौ कविता नेरकर चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंशसिंह चंदेल, चाळीसगांव उपविभाग यांच्या सुचना व मार्गदर्शना नुसार आज दि.२९/०४/२०२५ रोजी भडगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पांडुरंग पवार, श्रे.उपनिरी. पुरुषोत्तम पाटील, पोहेकाँ २८८० निलेश ब्राम्हणकार, पोकाँ/१९३२ प्रविण परेदशी, पोकाँ/१६७६ सुनिल राजपूत अशांनी कोळगाव ता. भडगाव येथे जावुन व्हायरल व्हिडीओ मध्ये मुलास मारहाण व शिवीगाळ करणारा इसम याच्या घरी जावुन त्याचा शोध घेतला असता तो घरी मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव सुनिल भास्कर पवार रा. कोळगाव ता. भडगाव असे सांगितले. त्यावरुन त्यास व्हायरल झालेल्या व्हिडीओ बाबत विचारपुस केली असता त्याने व्हायरल झालेला व्हिडीओ हा माझाच आहे व माझ्या मुलाचा अभ्यास घेत होतो व तो शाळेत जात नसल्याने त्यास मारहाण व शिवीगाळ केली असले बाबत त्याने कबुली दिलेली आहे. त्यावरुन भडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार १९३२ प्रविण कडु परेदशी यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवुन भडगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. १६०/२०२५ मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ चे उल्लघंन कलम ७५ सह भा.न्य.सं. कलम ११५(२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक श्री माहेश्वर रेड्डी सो, जळगाव, मा.अपर पोलीस अधिक्षक कविता नेरकर सो, चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंशसिंह चंदेल, चाळीसगांव उपविभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री पांडुरंग पवार, श्रे.उपनिरी. पुरुषोत्तम पाटील, पोहेकाँ २८८० निलेश ब्राम्हणकार, पोकाँ/१९३२ प्रविण परेदशी, पोकाँ/१६७६ सुनिल राजपूत यांनी केली असुन गुन्हाचा पुढील तपास श्रे.उपनिरी. पुरुषोत्तम पाटील हे करीत आहेत.

पांडुरंग विठ्ठल पवार
पोलीस निरीक्षक
भडगाव पोलीस स्टेशन